**तात्काळ/कालमर्यादा**

क्र पोमसं/८/४६-एफ/लिपिक/ललेपदोन्नती/३४४/२०१३ मुंबई, दिनांक :- १६ /१/२०१७

**विषय** :- पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिपत्याखालील शहर लिपिक संवर्गातील निम्नश्रेणी लघुलेखक, उच्चश्रेणी लघुलेखक व स्वीय सहायक या संवर्गातील साखळी त्रिमीती पदांमधील एकूण १५ पदे लघुटंकलेखक पदात श्रेणी अवनत करुन लिपिक प्रवर्गातून पदोन्नतीने भरणेबाबत...

*****

**ज्ञापन/परिपत्रक :-**

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक एमआयएस-०४१२/प्र.क्र.२८४/ पुर्नबांधणी क्र.१५/पोल-५ ब, दि.१६/१२/२०१६ अन्वये पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिपत्याखालील जिल्हा लिपिक संवर्ग / मुफसल लिपिक संवर्ग व शहर लिपिक संवर्गातील निम्नश्रेणी लघुलेखक, उच्चश्रेणी लघुलेखक व स्वीय सहायक या संवर्गातील साखळी त्रिमीती पदांमधील एकूण ५२ पदे खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून लघुटंकलेखक पदात कायमस्वरुपी श्रेणी अवनत करण्यास मान्यता देण्यात आली आहे :-

१) लघुटंकलेखकांची सरळसेवेची व पदोन्नतीची पदे भरल्यानंतर शासनाने विहीत केलेली बिंदूनामावली पोलीस महासंचालक यांनी तयार करावी.

२) वरिष्ठ श्रेणी लिपिक पदाची वेतनश्रेणी घेणाऱ्या जिल्हा लिपिक, मुफसल लिपिक व शहर लिपिक या संवर्गातील कर्मचाऱ्यांना लघुटंकलेखक पदासाठी सेवाप्रवेश नियमांत विहीत केलेल्या तरतुदीनुसार लघुटंकलेखनाचे व टंकलेखनाचे अर्हता प्रमाणपत्र धारकांना पदोन्नतीसाठी पात्र समजण्यात यावे.

३) निम्नश्रेणी लघुलेखक पदाची विहित अर्हता धारण करणाऱ्या कर्मचाऱ्यांना लघुटंकलेखक पदावर नियमित ३ वर्ष सेवा पुर्ण झाल्यावर ज्येष्ठता अधीन पात्रता निकष पुर्ण केल्यास पदोन्नती देण्यात येईल.

४) सदरचे पदे कायमस्वरुपी लघुटंकलेखक पदावर श्रेणी अवनत केल्याने शासनावर आर्थिक बोजा पडणार नाही व ही पदे कायम पदावनत केल्यानंतर रिक्त होणाऱ्या पदांसाठी पदनिर्मिती करता येणार नाही.

२. सदर श्रेणीअवनतीमुळे पोलीस महासंचालक यांच्या शहर लिपिक संवर्गात लघुटंकलेखकांची एकूण १५ पदे नव्याने निर्माण झालेली आहेत. त्यामधील ७ पदे सरळसेवेने व ८ पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत. त्यामुळे, पोलीस महासंचालक यांच्या शहर लिपिक संवर्गातील लघुटंकलेखकांच्या बिंदूनामावलीनुसार पदोन्नतीने भरावयाच्या ८ पदांसंदर्भात पोलीस महासंचालक यांच्या शहर लिपिक संवर्गातील वरिष्ठ श्रेणी लिपिक पदाची वेतनश्रेणी घेणाऱ्या कर्मचाऱ्यांना खालील बाबी निदर्शनास आणून देण्यात येत आहेत :-

१) सामान्य प्रशासन विभागाने शासन अधिसूचना, सा.प्र.वि.क्र.एएससी-१५९३/३६१९/१४-अ, दि.३१/७/१९९७ अन्वये **लघुटंकलेखक** पदाचे सेवाप्रवेश नियम विहीत केले असुन, सदर सेवाप्रवेश नियमानुसार लघुटंकलेखक पदासाठी **८० श.प्र.मि. यापेक्षा कमी नाही इतक्या गतीचे लघुलेखनाचे आणि ४० श.प्र.मि. यापेक्षा कमी नाही इतक्या गतीचे इंग्रजी टंकलेखनाचे किंवा ३० श.प्र.मि. यापेक्षा कमी नाही इतक्या गतीचे मराठी टंकलेखनाचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र असणे** आवश्यक आहे;

२) लघुटंकलेखक पदावरील पदोन्नती स्विकारण्यास ईच्छुक असणाऱ्या लिपिकांचे लघुटंकलेखक पदी पदोन्नतीमुळे त्यांच्या मुळ लिपिक संवर्गातील पदोन्नतीचे लाभ तसेच आश्वासित प्रगती योजनेनुसार लिपिक पदाची वेतनश्रेणी मिळण्याचा हक्क संपृष्टात येणार आहेत. त्यामुळे संबंधिताने तसे विहित नमुन्यात लेखी बंधपत्र देणे आवश्यक राहील;

३) लघुटंकलेखक पदावर नेमणूक दिल्यानंतर सदर पदावर नियमित ३ वर्ष सेवा पुर्ण झाल्यावर, ज्येष्ठता अधीन पात्रता हा निकष पुर्ण केल्यास आरक्षणानुसार निम्नश्रेणी लघुलेखक पदावर पदोन्नती देण्यात येईल;

४) लघुटंकलेखक पदासाठी सुधारीत वेतन संरचना पे बँड १ मध्ये वेतन बँड रु.५२००-२०२०० + ग्रेड वेतन रु.२४००/- राहील;

५) पदोन्नती संदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय लागु राहतील.

३.	तरी, खालील नमुद घटक प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या वरिष्ठ श्रेणी लिपिक पदाची वेतनश्रेणी घेणाऱ्या कर्मचाऱ्यांपैकी जे कर्मचारी परिच्छेद क्र.२ मधील नमुद अर्हता पुर्ण करीत आहेत व अन्य बाबी मान्य करुन लघुटंकलेखक पदावर पदोन्नतीवर नियुक्तीस ईच्छुक आहेत, अशा कर्मचाऱ्यांची माहिती सोबत जोडलेल्या जोडपत्रामध्ये भरुन दि.३१/१/२०१७ पर्यंत या कार्यालयास सादर करावी.

३.	सदरचे परिपत्रक पोलीस महासंचालक यांच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

**( अर्चना त्यागी )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन),
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह).
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके / वाहतूक / लोहमार्ग / रा.रा.पो.बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, फोर्स वन, मुंबई / विशेष सुरक्षा विभाग, मुंबई.
संचालक व पोलीस अधीक्षक, अंगुली मुद्रा केंद्र, मुंबई.
पोलीस अधीक्षक, गु.अ.वि., कोकण भवन, बेलापूर, मुंबई.
अपर उप आयुक्त, रा.गु.वि. कोकण घटक, कोकण भवन, बेलापूर मुंबई.
कार्यकारी अभियंता, वाहतूक अभियांत्रिकी पथक, मुंबई.

प्रत :-

कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र.१ ते ४४.

२.	कार्यासन अधिकारी यांनी पोलीस महासंचालक यांच्या शहर लिपिक संवर्गातील वरिष्ठ श्रेणी पदाची वेतनश्रेणी घेणाऱ्या कर्मचाऱ्यांना उपरोक्त परिपत्रक निदर्शनास आणून द्यावे व लघुटंकलेखक पदावर पदोन्नतीवर नियुक्तीस ईच्छुक असलेल्या कर्मचाऱ्यांचे अर्ज, सोबत जोडलेल्या जोडपत्रातील माहितीसह का.क्र.८ कडे दि.२३/१/२०१६ पर्यंत सादर करावेत.

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पो.म.सं. कार्यालय, मुंबई.

२.	सदरचे परिपत्रक कृपया पोलीस महासंचालक यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन द्यावे.

प्रत माहितीकरिता सस्नेह सादर :-

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
**( लक्षवेध :- श्री सुरेश खाडे, उप सचिव )**

## जोडपत्र-अ

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अर्जदार कर्मचाऱ्याचे पूर्ण नांव व पदनाम | :- | |
| २. | अ) जन्मदिनांक (सेवापुस्तकाच्या प्रथम पृष्ठाच्या साक्षांकित प्रतीसह)<br>ब) सेवानिवृत्तीचा दिनांक | :- | |
| ३. | लिपिक पदावरील नेमणूकीचा दिनांक/ नियुक्तीचा प्रकार<br>(लिपिक- टंकलेखक/ कश्रेलि)<br>(सरळसेवा / पदोन्नती) | :- | |
| ४. | जात व जातीचा प्रवर्ग व जात वैधता प्रमाणपत्र (साक्षांकित प्रतीसह) | :- | |
| ५. | सध्याचे नेमणूकीचे ठिकाण व संवर्ग | :- | |
| ६. | अ) सध्याचे वेतन बँड<br>ब) सध्या घेत असलेले मूळ वेतन + ग्रेड वेतन | :- | |
| ७. | अपंग आहे काय? असल्यास अपंगत्वाचा प्रकार नमुद करावा. (अस्थीव्यंग / दृष्टीदोष / कर्णबधीर इ.) नमूद करावा. | :- | |

**अर्जदाराने सादर करावयाचे बंधपत्र**

मी...................................................................... लघुटंकलेखक पदावर पदोन्नती घेण्यास इच्छूक असून, लघुटंकलेखक पदावर पदोन्नती दिल्यानंतर लिपिक पदाच्या पदोन्नती साखळीतील पदोन्नतीचे लाभ तसेच आश्वासित प्रगती योजनेनुसार लिपिक पदाची वेतनश्रेणी मिळण्याचा माझा हक्क संपुष्टात येईल, याची मला जाणीव असून लघुटंकलेखक पदावरील पदोन्नती संदर्भातील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

दिनांक : / /२०१७

ठिकाण :

स्वाक्षरी

अर्जदाराचे पूर्ण नांव व पदनाम

---

अर्जदाराच्या अर्जासोबत खालील साक्षांकित क्रमानुसार सादर करावीत.

१. सेवापुस्तकातील पहिल्या पृष्ठाची साक्षांकित प्रत.
२. जातीचे प्रमाणपत्र
३. जात वैधता प्रमाणपत्र
४. मराठी टंकलेखनाचे ३० किंवा इंग्रजी टंकलेखन ४० उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र
५. मराठी लघुलेखन ८० श.प्र.मि. यापेक्षा कमी नाही इतक्या गतीचे लघुलेखन

## <u>जोडपत्र- ब</u>

संबधित घटकप्रमुखांनी सादर करावयाची माहिती

सुचना :- अर्जदाराने जोडपत्र अ मध्ये सादर केलेली माहिती घटक प्रमुखांनी पडताळणी करुन सादर करावी. प्रत्येकासाठी स्वतंत्र प्रपत्रे सादर करावीत.

<table>
<tr><td>१.</td><td colspan="2">अर्जदार कर्मचाऱ्याचे पुर्ण नांव व पदनाम</td><td>:-</td><td colspan="3"></td></tr>
<tr><td>२.</td><td colspan="2">विभागीय चौकशी किंवा न्यायिक प्रकरण सुरू / प्रस्तावित अथवा प्रलंबित आहे काय ? एखादी शिक्षा भोगत आहे / प्रस्तावित आहे काय (असल्यास सविस्तर माहिती सादर करावी.)</td><td>:-</td><td colspan="3"></td></tr>
<tr><td colspan="7">मागील पाच वर्षाचा गोपनीय अहवालाची प्रतवारी गोपनीय अहवालाच्या साक्षांकित प्रतिसह (५ वर्षाची सेवा पुर्ण न झालेल्या कर्मचाऱ्याच्या बाबतीत मागिल तीन वर्षाचे गोपनीय अहवाल सादर करावेत.)</td></tr>
<tr><td></td><td>२०११-१२</td><td>२०१२-१३</td><td>२०१३-१४</td><td>२०१४-१५</td><td>२०१५-१६</td><td>सरासरी प्रतवारी</td></tr>
</table>

प्रमाणित करण्यात येते की, वर नमुद माहिती या कार्यालयाच्या अभिलेखानुसार बरोबर असुन लघुटंकलेखक पदाकरिता सदर उमेदवार पात्र ठरत आहे.

संबधित घटकप्रमुख यांची सही व शिक्का

---

अर्जदाराने दिलेल्या अर्जासोबतची सर्व कागदपत्रे व साक्षांकित कागदपत्रे क्रमानुसार सादर करावीत.